VOL- XII ISSUE- V MAY 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ महिला उमेदवारांची कामगिरी : विशेष संदर्भ लातूर आणि नांदेड जिल्ह्यातील महिला उमेदवारांची कामगिरी

**डॉ. हरिश्चंद्र जनार्दन चौधरी,**
राज्यशास्त्र विभागप्रमुख (पदवी व पदव्युत्तर )
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.

भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देश आहे. निवडणूक प्रक्रिया लोकाशाही जिवंत ठेवण्याचे कार्य करते. निवडणूक ही देशाच्या , राज्याच्या सर्व घटकास वळण लावण्याचे कार्य करते. असे म्हटले जाते की, एखाद्या देशाचा विकास कशावर आधारित असतो तर त्या देशातील शासनावर. शासन कोणत्या प्रकारचे असावे हा ठरविण्याचा अधिकार लोकशाहीत जनतेला असतो. जनता म्हणजे त्या देशातील सर्व स्त्री व पुरुष होत. लोकसंख्येच्या प्रमाणात पुरुषा बरोबर स्त्रियांची संख्या आहे. यामुळे आज पुरुषाबरोबर महिला मतदारांना महत्वाचे स्थान आहे

महाराष्ट्रात विधानसभेचा कार्यकाळ पूर्ण होत असल्याने निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक नोव्हेंबर २०२४ मध्ये घेतली. ही निवडणुक अतिशय महत्वाच्या घटकावर पार पडली. या निवडणुकीत राजकीय पक्षांनी महिला या घटकांकडे पाहत अनेक आश्वासने दिली होती. याचाच अर्थ ही निवडणुकीत राजकीय पक्षांनी महिलांची लोकसंख्येतील गणिताचा विचार करून अनेक आश्वासने दिली होती. याचा प्रभाव महिला मतदारांवर झाला. त्याच बरोबर अनेक महिलांनी निवडणुकीत प्रत्यक्ष सहभाग घेऊन निवडणुकीत आपला सहभाग नोंदविला .

महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील लातूर व नांदेड हे दोन जिल्हे राजकीयदृष्ट्या अतिशय महत्वाचे जिल्हे आहेत. या दोन्ही जिल्ह्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भूषविले आहे. अशा दोन जिल्ह्यात महाराष्ट विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये महिला उमेदवारांची कामगिरी कशी राहिली आहे याचे अध्ययन करणे आवश्यक आहे.

**उद्दिष्ट्ये :-**

या शोधनिबंधा साठी खालील उद्दिष्ट्ये समोर ठेवून शोधनिबंधाची मांडणी केली जाणार आहे.

१) लातूर जिल्ह्यात राजकीय पक्षांची महिला उमेदवारांची कामगिरीचे अध्ययन करणे.
२) नांदेड जिल्ह्यात राजकीय पक्षांची महिला उमेदवारांची कामगिरीचे अध्ययन करणे.
३) लातूर जिल्ह्यात महिला उमेदवारांच्या कामगिरीचे अध्ययन करणे.
४) नांदेड जिल्ह्यात महिला उमेदवारांची कामगिरीचे अध्ययन करणे.
५) दोन्ही जिल्ह्यातील राजकीय वारसदार महिलांच्या कामगिरीचे अध्ययन करणे.

**I) लातूर जिल्ह्यात राजकीय पक्षांची महिला उमेदवारांची कामगिरीचे अध्ययन :-**

लातूर जिल्ह्यात विधानसभेच्या एकूण ०६ मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून राष्ट्रीय पक्ष, राज्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्ष , व काही अपक्ष महिला उमेदवारांनी निवडणूकीत सहभाग घेतला. त्याचा आढावा खालील प्रमाणे करता येईल.

तक्ता क्र. १

| अ . क्र | राजकीय पक्ष | उमेदवारांची संख्या | विजयी | पराभव |
|---|---|---|---|---|
| १ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष | ०० | ०० | ०० |
| २ | भारतीय जनता पक्ष | ०१ | ०० | ०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष( अजित पवार ) | ०० | ०० | ०० |
| ४ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरद पवार) | ०० | ०० | ०० |
| ५ | शिवसेना ( उद्धव ठाकरे ) | ०० | ०० | ०० |
| ६ | शिवसेना ( एकनाथ शिंदे ) | ०० | ०० | ०० |
| ७ | शेतकरी कामगार पक्ष | ०० | ०० | ०० |
| ८ | वंचित आघाडी | ०१ | ०० | ०० |
| ९ | अपक्ष | ०१ | ०० | ०० |

वरील तक्ता क्र. १ वरून हे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील सहा मतदारसंघातून भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने कोणत्याही महिलेस उमेदवारी दिली नाही. भारतीय जनता पक्षाने लातूर शहर मतदासंघातून उमेदवारी दिली होती. परंतु त्यांचा पराभव झाला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष ( अजित पवार ), राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष( शरद पवार ), शिवसेना ( उद्धव ठाकरे ), शिवसेना ( एकनाथ शिंदे ), शेतकरी कामगार पक्ष या पक्षांनी कोणत्याही महिलेस उमेदवारी दिली नाही. वंचित आघाडी व अपक्षांनी एका जागेवर उमेदवारी दिली परंतु त्यात त्यांना विजय प्राप्त करता आला नाही.

सरांशतः लातूर जिल्ह्यात केवळ दोन राजकीय पक्षाने व अपक्षांनी महिलेस उमेदवारी दिली परंतु त्यांना यश प्राप्त झाले नाही. लातूर जिल्ह्यात महिला उमेदवारांची कामगिरी यशस्वी होऊ शकली नाही.

**II) नांदेड जिल्ह्यात राजकीय पक्षांची महिला उमेदवारांची कामगिरीचे अध्ययन :-**

नांदेड जिल्ह्यात विधानसभेचे एकूण ०९ मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून राष्ट्रीय पक्ष, राज्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्ष , व काही अपक्ष महिला उमेदवारांनी निवडणूकीत सहभाग घेतला. त्याचा आढावा खालील प्रमाणे करता येईल.

तक्ता क्र. २

| अ . क्र | राजकीय पक्ष | उमेदवारांची संख्या | विजयी | पराभव |
|---|---|---|---|---|
| १ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष | ०१ | ०० | ०१ |
| २ | भारतीय जनता पक्ष | ०१ | ०१ | ०० |
| ३ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष( अजित पवार ) | ०० | ०० | ०० |
| ४ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष( शरद पवार ) | ०० | ०० | ०० |
| ५ | शिवसेना ( उद्धव ठाकरे ) | ०१ | ०० | ०१ |
| ६ | शिवसेना ( एकनाथ शिंदे ) | ०० | ०० | ०० |
| ७ | शेतकरी कामगार पक्ष | ०२ | ०० | ०२ |
| ८ | ब.स.पा | ०१ | ०० | ०१ |
| ९ | अपक्ष व इतर | ०८ | ०० | ०८ |

वरील तक्ता क्र. २ वरून हे दिसून येते की, नांदेड जिल्ह्यातील नायगाव मतदारसंघातून भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने एका महिलेस उमेदवारी दिली परंतु त्यांना विजय प्राप्त करता आला नाही. . भारतीय जनता पक्षाने भोकर मतदासंघातून उमेदवारी दिली व त्यांनी विजय प्राप्त केला. झाला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष ( अजित पवार ), राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष( शरद पवार ), शिवसेना ( एकनाथ शिंदे ),या पक्षांनी कोणत्याही महिलेस उमेदवारी दिली नाही. शिवसेना ( उद्धव ठाकरे ), या पक्षाने नांदेड (उत्तर) या मतदारसंघातून

उमेदवारी दिली परंतु त्यांना विजय प्राप्त झाला नाही. शेतकरी कामगार पक्षाने लोहा व नायगाव या दोन मतदारसंघातून महिलांना उमेदवारी दिली परंतु त्यांना विजय प्राप्त करता आला नाही. अपक्ष व इतर काही पक्षांनी एकूण ०८ जागेवर उमेदवारी दिली परंतु त्यात त्यांना विजय प्राप्त करता आला नाही.

सरांशतः नांदेड जिल्ह्यात केवळ चार राजकीय पक्षाने व अपक्षांनी महिलेस उमेदवारी दिली परंतु भारतीय जनता पक्ष वगळता इतर पक्षांच्या महिला उमेदवार विजयी झाल्याचे दिसत नाहीत.

III) **लातूर जिल्ह्यातील महिला उमेदवारांची कामगिरी:-**

लातूर जिल्ह्यात एकूण सहा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून निवडणूक लढविलेल्या महिला उमेदवारांच्या कामगिरीचे अध्ययन करणे आवश्यक आहे. लातूर जिल्ह्यातील निवडणूक लढविलेल्या मतदारसंघनिहाय महिला उमेदवारांची अध्ययन खालील तक्त्याद्वारे करता येईल.

**लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ :-**

तक्ता क्र. ३.१

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | सुमित्राबाई उर्फ स्वाती विक्रम जाधव पाटील | अपक्ष | ६९८ | पराभूत |

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून केवळ एका महिला उमेदवाराने निवडणूक लढविली. सुमित्राबाई उर्फ स्वाती विक्रम जाधव पाटील यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली त्यांना या निवडणुकीत ६९८ मते प्राप्त झाली. त्यांना या निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला.

**लातूर शहर विधानसभा मतदारसंघ :-**

तक्ता क्र. ३.२

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. अर्चना पाटील चाकूरकर | भारतीय जनता पार्टी | १०६७१२ | पराभूत |

लातूर शहर विधानसभा माताफार्संघातून भारतीय जनता पार्टी या राष्ट्रीयकृत पक्षाकडून डॉ. अर्चना पाटील चाकूरकर या एकमेव महिला उमेदवाराने निवडणूक लढविली . त्यांना या निवडणूकीत १०६७१२ मते प्राप्त झाली. त्यांचा या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी पराभव केला.

**निलंगा विधानसभा मतदारसंघ :-**

तक्ता क्र. ३.३

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | मंजू हिरालाल निंबाळकर | वंचित बहुजन आघाडी | ३८९३ | पराभूत |

निलंगा विधानसभा मतदारसंघातून केवळ एका महिला उमेदवारांनी निवडणूक लढविली . मंजू हिरालाल निंबाळकर यांनी वंचित बहुजन आघाडी कडून निवडणूक लढविली . त्यांना या निवडणुकीत ३८९३ मते प्राप्त झाली. या निवडणुकीत त्यांचा पराभव भारतीय जनता पार्टीचे उमेदवार संभाजी पाटील निलंगेकर यांनी केला .

लातूर जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेता हे दिसून येते की, जिल्ह्यात सहा मतदासंघ असतानाही केवळ तीनच मतदारसंघातून महिला उमेदवारांनी निवडणूक लढविली. या निवडणुकीत कोणत्याही महिला उमेदवारास यश प्राप्त झाले नाही.

IV) **नांदेड जिल्ह्यातील महिला उमेदवारांची कामगिरी :-**

नांदेड जिल्ह्यात एकूण नऊ मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून निवडणूक लढविलेल्या महिला उमेदवारांच्या कामगिरीचे अध्ययन करणे आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्यातील निवडणूक लढविलेल्या मतदारसंघनिहाय महिला उमेदवारांची अध्ययन खालील तक्त्याद्वारे करता येईल.

**हदगाव विधानसभा मतदारसंघ :-**

तक्ता क्र. ४.१

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | लत्ता माधवराव फाळके | अपक्ष | १९१ | पराभूत |

हदगाव विधानसभा मतदारसंघातून केवळ एका महिलेने अपक्ष म्हणून निवडणूक लढविली. या निवडणुकीत त्यांना

१९१ मते प्राप्त झाली. त्यांना या निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला.

**भोकर विधानसभा मतदारसंघातील महिला उमेदवारांची कामगिरी:-**

तक्ता क्र. ४.२

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | चव्हाण श्रीजया अशोकरव | भारतीय जनता पार्टी | १३३१८७ | विजयी |
| २ | कौसर सुलतानाअलताफअहमद | इंडियन नॅशनल लीग | ९१ | पराभव |
| ३ | महानंद नागोराव मोटेकर | अपक्ष | ६६ | पराभूत |

भोकर विधानसभा मतदारसंघातून एकूण तीन महिला उमेदवारांनी निवडणूक लढविली . भारतीय जनता पार्टी या राष्ट्रीय पक्षाकडून चव्हाण श्रीजया अशोकराव यांनी निवडणूक लढविली. या निवडणुकीत त्यांनी १३३१८७मते घेतली. त्यांनी आपले प्रतिस्पर्धी भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे उमेदवार कदम कोंढेकर तिरूपती उर्फ पप्पू बाबुराव यांचा पराभव करून विजय प्राप्त केला.

या निवडणुकीत इंडियन नॅशनल लीग या नोंदणीकृत पक्षाच्या उमेदवार कौसर सुलतानाअलताफअहमद यांनी निवडणूक लढविली. त्यांना केवळ ९१ मते प्राप्त झाली. अपक्ष उमेदवार म्हणून महानंद नागोराव मोटेकर यांनी निवडणूक लढविली त्यांना केवळ ६६ मते प्राप्त झाली.

**नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील महिला उमेदवारांची कामगिरी:-**

तक्ता क्र. ४.३

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | संगीता विठ्ठल पाटील | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) | २२७०६ | पराभूत |
| २ | ज्योती गणेश शिंदे | अपक्ष | ३१९ | पराभूत |

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातून एकूण तीन महिलांनी निवडणूक लढविली. शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून संगीता विठ्ठल पाटील यांनी निवडणूक लढविली. त्यांना २२७०६ मते प्राप्त झाली. त्या चवथ्या क्रमांकावर राहिल्या .

ज्योती गणेश शिंदे यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली त्यांना केवळ ३९९ मते प्राप्त झाली.

**लोहा विधानसभा मतदारसंघातील महिला उमेदवारांची कामगिरी:-**

तक्ता क्र. ४.४

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | आशाबाई श्यामसुंदर शिंदे | शेतकरी कामगार पक्ष | १९७८६ | पराभूत |
| २ | आशाताई श्यामसुंदर शिंदे | अपक्ष | ४०३ | पराभूत |

लोहा विधानसभा मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाकडून आशाबाई श्यामसुंदर शिंदे यांनी निवडणूक लढविली त्यांना १९७८६ मते प्राप्त झाली. त्यांचाच नाव असणारे परंतु किंचीत नावात बदल असणाऱ्या आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनीही अपक्ष म्हणून निवडणूक लढविली परंतु त्यांना केवळ ४०३ मते प्राप्त होऊन त्यांना पराभव स्वीकारावा लागला.

**नायगाव विधानसभा मतदारसंघातील महिला उमेदवारांची कामगिरी:-**

तक्ता क्र. ४.५

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. मीनल पाटील खतगावकर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ८१५६३ | पराभूत |
| २ | अर्चना विठ्ठल पाटील | शेतकरी कामगार पक्ष | ९१० | पराभूत |

नायगाव विधानसभा मतदारसंघातून एकूण तीन महिला उमेदवारांनी निवडणूक लढविली. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातर्फे डॉ. मीनल पाटील खतगावकर यांनी निवडणूक लढविली. त्यांना ८१५६३ मते प्राप्त झाली. तर अपक्ष म्हणून अर्चना विठ्ठल पाटील यांनी निवडणूकV) लढविली. त्याना या निवडणुकीत ९१० प्राप्त झाली. दोन्ही महिला उमेदवारांचा पराभव झाला.

**देगलूर विधानसभा मतदारसंघ :-**

तक्ता क्र. ४.६

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | अनुराधा शंकर गंधारे (दाचावार) | महाराष्ट्र विकास आघाडी | १२९९ | पराभूत |

देगलूर विधानसभा मतदारसंघातून केवळ एका महिला उमेदवारांनी निवडणूक लढविली. अनुराधा शंकर गंधारे (दाचावार) यांनी महाराष्ट्र विकास आघाडीकडून निवडणूक लढविली त्यांना केवळ १२९९ मते प्राप्त झाली त्यांचा या निवडणुकीत पराभव झाला.

**मुखेड विधानसभा मतदारसंघातील महिला उमेदवारांची कामगिरी:-**

तक्ता क्र. ४.७

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|
| १ | अहिल्याबाई हणमंतराव मामीलवाड ठाणेकर | बहुजन समाज पार्टी | ११४० | पराभव |
| २ | कल्पना संजय गायकवाड | बुलुंद भारत पार्टी | ६४७ | पराभव |
| ३ | रुक्मिणीबाई शंकरराव गित्ते | जनता दल (सेक्युलर ) | ५६९ | पराभूत |

मुखेड विधानसभा मतदारसंघातून एकूण तीन महिलांनी निवडणूक लष्विल्या. अहिल्याबाई हणमंतराव मामीलवाड ठाणेकर यांनी बहुजन समाज पार्टी कडून निवडणूक लढविली त्यांना या निवडणुकीत ११४० मते प्राप्त झाली. कल्पना संजय गायकवाड यांनी बुलुंद भारत पार्टी या नोंदणीकृत राजकीय पक्षा कडून निवडणूक लढविली त्यांना या निवडणुकीत ६४७ मते प्राप्त झाली. रुक्मिणीबाई शंकरराव गित्ते यांनी जनता दल (सेक्युलर ) या पक्षाकडून निवडणूक लढविली त्यांना या निवडणुकीत ५६९ मते प्राप्त झाली. या निवडणुकीत निवडणूक लढविलेल्या तिन्ही महिला उमेदवारांचा पराभव झाला.

**दोन्ही जिल्ह्यातील राजकीय महिला वारसदारांची कामगिरी.:-**

लातूर आणि नांदेड या दोन जिल्ह्यांच्या राजकीय महिला वारसदारांनी या निवडणुकीत सहभाग घेतल्याचे दिसून येते. वेगवेगळ्या पक्षांकडून त्यांनी निवडणूक लढविली या निवडणुकीत वारसदार म्हणून त्यांनी निवडणूक लढविली. त्यांच्या कामगिरीचे अध्ययन करणे आवश्यक आहे.

**लातूर जिल्हा :-**

तक्ता क्र. ५.१

| अ.क्र. | मतदारसंघ | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|---|
| १ | लातूर शहर | डॉ. अर्चना पाटील चाकूरकर | भारतीय जनता पार्टी | १०६७१२ | पराभूत |

लातूर जिल्ह्यातून केवळ एकाच महिला वारसदाराने निवडणूक लढविली. डॉ. अर्चना पाटील चाकूरकर या भारताचे माजी गृहमंत्री व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ट नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सूनबाई आहेत. त्यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पार्टीत प्रवेश घेतला होता. पक्षाने त्यांना लातूर शहर मतदारसंघातून सलग तीनवेळा निवडून आलेले माजी मंत्री अमित देशमुख यांच्या विरोधात दिली होती. अमित देशमुख हे महाराष्ट्रचे दिवंगत नेते विलासराव देशमुख यांचे चिरंजीव होत. लातूरची ही निवडणूक एका अर्थाने एकाच पक्षात काम केलेल्या नेत्यांच्या वारसदारात झालेली ही निवडणूक होती . या निवडणुकीत अमित देशमुख यांच्याकडून डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांना पराभव पत्करावा लागला.

लातूर जिल्ह्यातून एकही महिला उमेदवार निवडून आले नाही. लातूर जिल्ह्यात एकूण सहा मतदारसंघ आहे त्यापैकी केवळ लातूर संघातून महिला वारसदार निवडणूक लढविल्याचे दिसून येते.

**नांदेड जिल्हा :-** नांदेड जिल्ह्यात एकूण नऊ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी ज्या मतदारसंघातून महिला

वारसदारांनी निवडणूक लढविली त्याचे अध्ययन खालील तक्त्याचे आधारे करणार आहोत.

तक्ता क्र. ५.२

| अ.क्र. | मतदारसंघ | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्राप्त मते | निकाल |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोकर | चव्हाण श्रीजया अशोकराव | भारतीय जनता पार्टी | १३३१८७ | विजयी |
| 2 | लोहा | आशाबाई श्यामसुंदर शिंदे | शेतकरी कामगार पक्ष | १९७८६ | पराभूत |
| 3 | नायगाव | डॉ. मीनल पाटील खतगावकर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ८१५५३ | पराभूत |

नांदेड जिल्ह्यात तीन मतदारसंघातून महिला वारसदारांनी निवडणूक लढविल्याचे दिसून येते. यात एका वारसदाराचा विजय झाला आहे तर इतर दोन वारसदारांचा पराभव झाल्याचे दिसून येते.

भोकर विधानसभा मतदारसंघातून चव्हाण श्रीजया अशोकराव यांनी निवडणूक भारतीय जनता पार्टी पक्षा कडून निवडणूक लढविली. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या त्या कन्या आहेत. अशोकराव चव्हाण यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पार्टी पीएकेएसएचएटी प्रवेश केला होता. त्यांना राज्यसभेतून खासदार म्हणून पाठविले तर त्यांची कन्या चव्हाण श्रीजया यांना भोकर मतदारसंघातून उमेदवारी दिली. २०१४ च्या विधानसभेत त्यांच्या आई म्हणजेच अशोकराव चव्हाण यांच्या पत्नीने या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले होतेतर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत स्वत: प्रतिनिधित्व केले होते. या २०२४ च्या निवडणुकीत त्यांनी आपल्या कन्येस उमेदवारी देऊन वारसदार केल्याचे दिसून येते. या निवडणुकीत त्यांनी आपले प्रतीस्पर्धी भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे उमेदवार कदम कोंढेकर तिरूपती उर्फ पप्पू बाबुराव यांचा पराभव करून विजय प्राप्त करून पुन्हा एकदा आपल्या घरात आमदारकी ठेवल्याचे दिसून येते.

लोहा विधानसभा मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाकडून आशाबाई श्यामसुंदर शिंदे यांनी निवडणूक लढविली. त्या २०१९ च्या विधानसभेत लोहा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केलेले आ. श्यामसुंदर शिंदे यांच्या पत्नी आहेत. तसेच त्यांनी ज्यांच्याविरोधात निवडणूक लढविली ते प्रताप पाटील चिखलीकर हे त्यांचे बंधु होत. म्हणजेच ही निवडणूक भाऊ व बहीण यांच्यात झाली. या निवडणुकीत आशाबाई शिंदे यांचा पराभव झाला. एकाअर्थाने ही निवडणुकीत वारसदार कोण यावरून झालेली दिसून येते.

नायगाव विधानसभा मतदारसंघातून डॉ. मिनल पाटील खतगावकर यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाकडुन निवडणूक लढविली. मीनल खतगावकर या माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या सुनबाई आहेत. भास्करराव पाटील खतगावकर यांनी भारतीय जनता पार्टी पक्षातून भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला होता.त्यांनी या निवडणुकीत ८१५५३ मते प्राप्त केली. परंतु त्यांना विजय प्राप्त करता आला नाही. त्यांना भारतीय जनता पार्टीचे उमेदवार राजेश पवार यांच्याकडून पराभव पत्कारावा लागला.

वरील प्रमाणे महिला वारसदारांच्या कामगिरीचे अध्ययन केले आहे.

**निष्कर्ष:-**

१) लातूर जिल्ह्यातून राजकीय पक्षांनी महिलास उमेदवारी दिल्याचे दिसून येते.

२) नांदेड जिल्ह्यातून राजकीय पक्षांनी महिलास उमेदवारी दिल्याचे दिसून येते.

३) लातूर जिल्ह्यातूनमहिलांनी निवडणूक लढविली परंतु त्यांना अपयश आल्याचे दिसून येते.

४) नांदेड जिल्ह्यातूनमहिलांनी निवडणूक लढविली त्यात एका महिला उमेदवारास निवडणुकीत विजय प्राप्त करता आल्याचे दिसून येते.

५) दोन्ही जिल्हे लातूर व नांदेड या दोन जिल्ह्यातून महिला राजकीय वारसदारांनी निवडणूक लढविली. तीन महिला वारसदारांनी निवडणूक लढविली परंतु त्यात केवळ भोकर विधानसभा मतदारसंघातून चव्हाण श्रीजया अशोकराव ह्याच विजयी झाल्याचे दिसून येते.

( प्रस्तुत संशोधकास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने राज्यशास्त्र विषयात लघुशोध प्रकल्प मंजूर केला आहे त्या लघुशोध प्रकल्पाच्या आर्थिक निधीतून हा सदरील शोधनिबंध प्रकाशित केला जात आहे. )

**संदर्भ :-**


१) दैनिक लोकमत ,२४ नोव्हेंबर २०२४

२) दैनिक एकमत ,२४ नोव्हेंबर २०२४

३) दैनिक लोकसत्ता ,२४ नोव्हेंबर २०२४

४) दैनिक सकाळ ,२४ नोव्हेंबर २०२४

५) दैनिक सामना ,२४ नोव्हेंबर २०२४

६) दैनिक पुण्यनगरी,२४ नोव्हेंबर २०२४

७) ile:///H:/ELECTION%202024/LATUR%20DIST%20VIDHANSABHA/2024122061.pdf

८) List-Of-Contesting-Candidate-Notification-AC2024.pdf